

आजचा रंग : मोरपंखी

मोरपंखी रंग म्हणजे शांतता, हुशार आणि प्रसन्नतेचा रंग

अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com | सोमवार, दि. २३ ऑक्टोबर २०२३ | वर्ष : २२ वे | अंक : २५ वा | किंमत : ५ रुपये | पाने ८


## भारताचा दिमाखदार विजय; न्यूझीलंडवर ४ गड्यांनी मात

**धर्मशाला :** भारत आणि न्यूझीलंड यांच्यात रविवारी झालेल्या सामान्यात भारताने न्यूझीलंडवर ४ गडी राखून पराभव करीत दिमाखदार फायनल एन्ट्री केली आहे. प्रथम फलंदाजी करताना न्यूझीलंडने २७३ धावांची खेळी केली. विजयासाठी २७४ धावांची आवाहन घेत भारतीय संघाने हे लक्ष्य १२ चेंडू शिल्लक राखून ६ गड्यांच्या मोबदल्यात २७४ धावा काढून ४८ शतकात पूर्ण केले. भारताकडून विराट कोहली (९५) याने सर्वाधिक धावा केल्या. तसेच रविंद्र जडेजाने (नाबाद ३९) धावा करीत विजयावर शिक्का मोर्तब केले. भारताकडून रोहित शर्मा (४६), शुभमन गिल(२६), श्रेयश अय्यार (३३), लोकेश राहुल (२७) यांनी सुरेख खेळ केल्या.

# टाकळीत पिस्तुलमधून हवेत गोळीबार

## मंद्रूप पोलिसांनी केले पाच जणांना अटक

सुराज्य/दक्षिण सोलापूर

**दारू पिऊन किरकोळ भांडणामधून टाकळी येथे एकाने पिस्तूलमधून हवेत पाच राऊंड गोळीबार केल्याची घटना घडली. यात पाच जणांना मंद्रूप पोलिसांनी अटक केली आहे. या गोळीबारामुळे टाकळी परिसरात खळबळ उडाली आहे.**

सोलापूर-विजयपूर राष्ट्रीय महामार्गालगत टाकळीत हॉटेल प्रशांत बीयरबार, परमीट रूम आहे. येथे वरील पाचजण शनिवारी रात्री दारू पीत बसले होते. तेव्हा मध्यधुंद अवस्थेत त्यांच्यामध्ये किरकोळ कारणावरून भांडण सुरू झाले. रागात एकमेकांच्या अंगावर धावत जाऊ लागले. त्यावेळी सिद्धाराम जानकर यांनी त्यांच्या जवळील रिव्हॉल्वरने हवेमध्ये पाच राऊंड गोळीबार केला. रात्री बाराच्या सुमारास याची माहिती मिळताच मंद्रूपचे सहायक पोलीस निरीक्षक प्रशांत हुले हे इतर पोलिसांसोबत घटनास्थळी आले. पोलीस आल्यानंतर सुध्दा पोलिसांच्या आदेशाचे पालन न करता त्यांनी भांडण सुरूच ठेवले. जानकर यांनी पुन्हा हवेत गोळीबार करण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी पोलिसांनी जानकला पिस्तुलासह ताब्यात घेतले. इतर चौघांनाही पकडून पोलीस ठाण्यात आणून अटक केले. सिद्धाराम चंद्रकांत जानकर, नागेश बहीरप्पा साबळे, शरणप्पा हणूमंत पाटील (तिघेजण रा. चिंचपूर), शिवशरण खंडप्पा दूधभाते, (टाकळी), अंकुश आमसिध्द घोडके (कुरघोट) असे अटक केलेल्या पाच संशयित आरोपींची नावे आहेत.

यावेळी पोलिसांनी ८० हजारांचे एक काळ्या रंगाचे रिव्हॉल्वर आणि त्यामध्ये पाच पुंगळ्या, एक जिवंत काडतूस, रिव्हॉल्वर ठेवण्याच्या लेदरच्या ब्राऊन रंगाच्या पाऊचमधील दोन जिवंत काडतुसे जप्त केली आहेत.

सार्वजनिक ठिकाणी मानवी जीवितास धोका निर्माण होईल, हे माहीत असतानाही पाच राऊंड फायर करून भीतीचे वातावरण निर्माण केले. पोलीस आल्यानंतरसुध्दा पोलिसांनी दिलेल्या आदेशाचे पालन न करता भांडण आपापसात सुरू ठेवले. पोलिसांसमोर हवेत गोळीबार करण्याचा प्रयत्न केला, म्हणून पोलीस शिपाई रोहन पवार यांनी पाच जणांविरुध्द फिर्यादी दिली आहे. त्यानुसार मंद्रूप पोलीस ठाण्यात भादवि कलम १४३,१४४, १४७, १४८,१६०, महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ११०, ११५ व १३५ शस्त्र अधिनियम १९५९ चे कलम ३,२५,२७ व ३० प्रमाणे गुन्हा दाखल झाला आहे. अधिक तपास सहायक पोलीस निरीक्षक प्रशांत हुले हे करीत आहेत.

# अहवाल प्राप्त होताच पुढील कारवाई

## तीन सदस्यीय समिती गठीत; प्रशासकीय कारवाई अटळ

## तिऱ्हे प्राथमिक आरोग्य केंद्राचे डॉक्टर अखेर चौकशीच्या फेऱ्यात

सुराज्य/सोलापूर

**उत्तर सोलापूर तालुक्यातील तिऱ्हे प्राथमिक आरोग्य केंद्रातील वादग्रस्त डॉक्टर अखेर चौकशीच्या फेऱ्यात सापडले असून, संबंधित डॉक्टरांची चौकशी समितीकडून चौकशी होणार आहे. या चौकशी समितीमध्ये तीन सदस्य समिती नेमण्यात आली आहे. या समितीमध्ये दोन क्लासवन अधिकारी आणि एक क्लास-टू दर्जाचे अधिकारी यांचा समावेश आहे. चौकशी समितीचा अहवाल प्राप्त होताच पुढील कारवाई करण्यात येणार असल्याचे डॉक्टर नवले यांनी 'दैनिक सुराज्य'च्या प्रतिनिधीशी बोलताना सांगितले.**

सुराज्य सोलापूर Impact

तिऱ्हे प्राथमिक आरोग्य केंद्रात गेल्या सहा महिन्यांपासून अनेक रुग्णांच्या तक्रारी येत असताना जिल्हा परिषद प्रशासन आणि जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांनी कोणत्याही प्रकारची दखल घेतली नव्हती. त्यामुळे हे प्रकरण अधिकच गंभीर होत गेले. आता केंद्रातील डॉक्टरांना चौकशीला सामोरे जावे लागले. वादग्रस्त डॉक्टरांची चौकशी सुरू केली आहे. हे प्रकरण पूर्वीच मिटले असते , परंतु डॉक्टरांनी आपल्या कामात सुधारणा न केल्याने हे प्रकरण पुन्हा गंभीर झाल्याने हा प्रकार घडल्याचे चर्चिले जात आहे. मात्र तसे झाले नाही. यासंदर्भात दैनिक सुराज्यने गेल्या तीन-चार दिवसांपासून रुग्णांची होणारी पिळवणूक, हेळसांड यासंदर्भात वाचा फोडणे आणि न्याय देण्यासाठी संबंधित आरोग्य केंद्रासंदर्भात डॉक्टरांनी केलेला हलगर्जीपणा तसेच तेथील लोकांच्या भावना याबाबत मागील तीन दिवसांपासून सविस्तर कैफीयत जनतेसमोर आणली आहे. संबंधित केंद्रातील डॉक्टर हे मनमानी करीत आहेत. रुग्णांची गैरसोय होत असून, त्यांच्या जीविताला धोका निर्माण झाल्याच्या अनेक तक्रारी समोर आल्या होत्या. याबाबत दैनिक सुराज्यने मागील तीन दिवसापांसून संबंधित प्रश्नांवर वाचा फोडण्याचा प्रयत्न केला. त्यावर आरोग्य अधिकारी डॉ. नवले यांच्याशी यासंदर्भात चौकशी केली असता तिऱ्हे प्राथमिक आरोग्य केंद्रातील डॉक्टरांची नुकतीच चौकशी सुरू झाल्याचे सांगितले. या तीन सदस्य समितीकडून संबंधित डॉक्टर आणि संपूर्ण केंद्राची पूर्ण चौकशी करण्यात येणार आहे.

### सीईओ नॉट रिचेबल?

जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मनिषा आव्हाळे या गेल्या दोन दिवसात नॉट रिचेबल असल्याचे दिसून आले. कारण उत्तर सोलापूर तालुक्यातील तिऱ्हे प्राथमिक आरोग्य केंद्रातील संबंधित महिला व पुरुष डॉक्टरांच्या मनमानी कारभाराबद्दल तालुक्यातून अनेक तक्रारी आल्या आहेत. या संदर्भामध्ये जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मनिषा आव्हाळे यांच्याकडे दैनिक सुराज्यच्या प्रतिनिधींनी दूरध्वनीवरून याबाबत चौकशी केली असता त्यांनी फोन उचलला नाही. त्यामुळे त्यांच्याकडून अपेक्षीत पुढील प्रशासकीय कारवाई संदर्भामध्ये किंवा अन न्य कोणतीही माहिती मिळू शकली नाही.

### 'सुराज्य'च्या वृत्ताची दखल

तिऱ्हे प्राथमिक आरोग्य केंद्रातील संबंधित डॉक्टरांच्या उद्धट उर्मट, आणि बेजबाबदारपणाच्या भूमिकेमुळे तिऱ्हेसह परिसरातील अनेक रुग्णांनी सुराज्यकडे तक्रारी केली. 'सुराज्य'ने यासंदर्भात मालिका वृत्त प्रसिद्ध केले. दरम्यान, प्रशासन खडबडून जागे झाले असून, प्रशासनाने सुराज्यच्या वृत्ताची दखल घेतली आहे. आता या संबंधित डॉक्टरांच्या चौकशीसाठी त्रिसदस्यीय समिती नियुक्त केली आहे.

## चारित्र्याच्या संशयातून पत्नीचा खून

**ममदाबाद येथील घटना**

सुराज्य/अक्कलकोट

ममदाबाद (अक्कलकोट) येथे पतीने चारित्र्याच्या संशयावरुन २८ वर्षीय पत्नीचा तीक्ष्ण कु-हाडीने मारून पत्नीचा गळा धडापासून वेगळे केले. ही घटना अक्कलकोट तालुक्यातील ममदाबाद येथे रविवारी पहाटे सहा वाजता घडली. सावित्रा हणमंत बिराजदार (वय-२८ वर्षे) असे मयत महिलेचे नाव आहे. आरोपी पती बसवराज हणमंत बिराजदार (वय-३५) याच्याविरुध्द उत्तर पोलीस ठाण्यामध्ये खुनाचा गुन्हा दाखल झाला.

मयताचे वडील हणमंतप्पा सिध्दरामप्पा इब्रामपुरे (वय,-७४ वर्षे, रा. खानापूर, ता. आळंद, जिल्हा कलबुर्गी) यांनी या घटनेची फिर्याद दिली.

अक्कलकोट तालुक्यातील ममदाबाद येथील आरोपी बसवराज हणमंत बिराजदार याने पत्नीला घरात त्रास देऊन लोखंडी कु-हाडीने, पात्याने तिच्या गळयावर मारून गंभीर जखमी करून तिचा खून केला. गेल्या अनेक महिन्यापासून आपली मृत पत्नी सावित्रा हिचा चारित्र्याचा संशयावरुन तो छळ करीत होता. त्यांना दोन मुली, एक मुलगा आहे.

आरोपी पती शेतीची कामे करीत होता. तर पत्नी घरातील कामे करायची. अधिक तपास पोसई पंडीत चव्हाण हे करीत आहेत. घटनास्थळी उपविभागीय पोलीस विलास यामावार यांनी भेट दिली.

तपास अधिकारी म्हणून पोसई पंडीत चव्हाण काम पाहत आहेत. आरोपी सकाळी साडेसहा वाजण्याच्या सुमारास उत्तर पोलीस ठाण्यामध्ये हजर झाला. त्याने चारित्र्याच्या संशयावरून खून केल्याची कबुली दिली. पोलिसांनी आरोपीला ताब्यात घेतले असून, गुन्हातील कुऱ्हाड हस्तगत केले आहे. अक्कलकोट ग्रामीण रूग्णालयात प्रेत उत्तरीय तपासणीसाठी पाठविले आहे. आरोपीला सोमवार, दि. २३ ऑक्टोबर रोजी न्यायालयात हजर करण्यात येणार आहे.

## अकलूजमधील मोहिते-पाटील इंजीनियरींग महाविद्यालयामध्ये ११ लाखांचा अपहार

**माजी प्राचार्यांविरुद्ध गुन्हा; ऑडीटरने दिली फिर्याद**

सुराज्य/सोलापूर

अकलूज येथील सहकार महर्षी शंकरराव-मोहिते इंजीनियरींग कॉलेजमध्ये ११ लाख ८४ हजार १०७ रुपयाचा अपहार केल्याप्रकरणी माजी प्रभारी प्राचार्य डॉ. इंद्रजीत निवासराव यादव (सध्या रा. पारगाव, ता.मिरज, जि.सांगली) यांच्याविरुद्ध अकलूजच्या पोलिसांनी नुकताच गुन्हा दाखल केला आहे.

शंकरनगर (ता.अकलूज) येथील सहकार महर्षी शंकरराव मोहिते-पाटील इंजीनिअर कॉलेजमध्ये डॉ. इंद्रजीत जाधव हे दि. २ एप्रिल ते १८ नोव्हेंबर २०२२ या कालावधीत प्रभारी प्राचार्य म्हणून काम करीत होते. त्यावेळी संस्थेला दिल्लीतील शासनाच्या आयसीटीईकडून १४ लाख ८० हजार १३४ रुपये अनुदान मंजूर झाले होते. त्यापैकी पहिला हप्ता ११ लाख ४४ हजार १०७ इतक्या रकमेचा धनादेश त्यांनी संस्थेच्या नावाने बँकेत स्वतंत्र खाते उघडून जमा करणे आवश्यक असताना त्यांनी ती रक्कम बँकेत स्वतः च्या वैयक्तीक खाते जमा केली. त्या रकमेचा स्वतःसाठी वापर करून अपहार करीत संस्थेचा विश्वासघात केला. अशा आशयाची फिर्याद नितीन गजेंद्र कुदळे (रा.अकलूज) या ऑडीटरने नुकतीच पोलिसात दाखल केली. पुढील तपास महिला फौजदार महाडिक या करीत आहेत.

## कुंभारीत तरुणाची आत्महत्या

**सोलापूर :** कुंभारी घरकूल परिसरात राहणाऱ्या एका ३५ वर्षीय विवाहित तरुणाने विहिरीत उडी टाकून आत्महत्या केली. ही घटना शनिवारी सायंकाळच्या सुमारास उघडकीस आली. हाजीमलंग मकबूल शेख (वय- ३५, कुंभारी घरकूल) असे मयताचे नाव आहे. त्याचा मृतदेह शनिवारी दुपारी ४ वाजेच्या सुमारास ब विभाग घरकूल येथील आनंद पंधे यांच्या शेतातील विहिरीतील पाण्यावर तरंगताना आढळून आला.

मयत हाजीमलंग शेख हा सेंट्रींगचे काम करीत असून त्याला दारूचे व्यसन होते. शनिवारी सकाळी तो घरातून निघून गेला होता. अशी नोंद वळसंग पोलिसात झाली असून, या मागचे कारण समजले नाही. पुढील तपास हवालदार बनकर करीत आहेत.

## शिक्षकच बनला भक्षक

**कॉलेजच्या युवतीसोबत अश्लिल चाळे**

### 'त्या' शिक्षकाविरुद्ध अकलूज पोलिसात गुन्हा

सुराज्य/माळीनगर

शिक्षकच भक्षक बनल्याचा धक्कादायक प्रकार अकलूज येथे उघडकीस आला आहे. ओळखीचा फायदा घेऊन प्राथमिक शाळेत शिकवणारा नराधम शिक्षकानेच अल्पवयीन मुलीचा विनयभंग केला. याबाबतच्या तक्रारीनंतर संबंधित शिक्षकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. महाविद्यालयीन युवतीसोबत अश्लिल चाळे केल्याप्रकरणी अकलूज पोलिसांत पोक्सोअंतर्गत गुन्हा दाखल झाला आहे. त्याला अटक करून पोलिसांनी पाच दिवसाची पोलीस कोठडी दिली आहे.

त्या नराधन शिक्षकाने त्या अल्पवयीन मुलीस आपण इंदापूर, पंढरपूरला फिरायला जाऊ, असा मेसेज केला. 'तू मम्मीला काही नको सांगू, आपण जाऊ' असा मेसेज केला. एवढ्यावर न थांबता त्या शिक्षकाने तर बेशर्मीचा कळसच गाठला. पुन्हा काही अश्लिल मेसेजकरून त्या युवतीस आपला बळी ठरविण्याचा प्रयत्न केला. त्याने तिला '१-४-३' चा अर्थ सांग म्हणून मेसेज केला. एका मेसेजमध्ये तर त्याने चक्क शारीरिक भूक, वासना, तृष्णा, शारीरिक गरजा... यासंदर्भात तिला शारीरिक गरजा पुरविण्यास भाग पाडणारे अश्लिश मेसेज केले.

दरम्यानचा काळात तो शिक्षक त्या मुलीचा घरी आला. त्या मुलीचा उजवा हात धरुन तिचा विनयभंग करण्याचा प्रयत्न केला. जर कुणाला सांगितली तर तुला जिवंत सोडणार नाही, अशी धमकी देऊन निघून गेला. यासंदर्भात त्या पीडित मुलीने आपल्या आई-वडिलांना संबंधित त्या शिक्षकाने केलेल्या कृत्याची माहिती दिली. त्यानंतर त्यांनी अकलूज पोलीस ठाणे गाठले.



या घटनेतील महाविद्यालयीन युवतीने अकलूज पोलीस ठाण्यात दिलेल्या तक्रारीनंतर संशयित आरोपीवर पोक्सो कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दरम्यान, संशयीत आरोपीला अकलूज पोलिसांनी अटक केली असून, त्याला पाच दिवसांची पोलिस कोठडी दिली आहे. त्याच्याविरुद्ध विनयभंग आणि पोस्कोच्या कायद्यांतर्गत गुन्हा दाखल केला. अधिक तपास पो. नि.दीपरत्न गायकवाड हे करीत आहेत.

## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे




एवढेच काय, दांडीया ही चायनीज आले आहेत!

# टोकाचे पाऊल उचलू नका; ते समाज, परिवाराला न परवडणारे

## एकनाथ शिंदेंचे मराठा बांधवांना आवाहन

सुराज्य/मुंबई

**मराठा कुटुंबातील मुलांनी आत्महत्या करणं आमच्यासाठी दु:ख देणारी वेदणा देणारी घटना आहे. आत्महत्या झाल्या आहेत त्या दुर्दैवी आहेत. महाराष्ट्र सरकार मराठा समाजाला आरक्षण देण्यासाठी कटीबद्ध आहे, सर्व प्रयत्न करत आहे, असं एकनाथ शिंदे म्हणाले. देवेंद्र फडणवीस यांच्या सरकार मध्ये आरक्षण दिलं होतं, ते हायकोर्टात टिकलं, सुप्रीम कोर्टात ते टिकलं नाही. आम्हाला काही बाबी सुप्रीम कोर्टात मांडता आल्या नाहीत. काही त्रुटी होत्या, मराठा समाज मागास असल्याचं सिद्ध करायला अपयश आलं. आम्ही क्युरेटिव्ह पिटीशन दाखल केलेली आहे. आम्ही क्युरेटिव्ह पिटीशन ऐकतो, असं सुप्रीम कोर्टानं म्हटलं आहे, असं एकनाथ शिंदे यांनी सांगितलं.**

सुप्रीम कोर्टाच्या सरन्यायाधीशांसमोर आपले तज्ज्ञ वकील पुरावे सादर करतील. मराठा आरक्षण मिळण्यासाठी एक मोठी संधी निर्माण झालेली आहे. मराठवाड्यातील कुणबी नोंदी असणारांना दाखले देण्यासाठी न्यायमूर्ती शिंदे समिती काम करत आहे. त्याचं देखील युद्ध पातळीवर काम सुरु आहे, असं एकनाथ शिंदे म्हणाले.

मराठा बांधवांना आवाहन करतो की टोकाचं पाऊल उचलू नका. मराठा समाजातील तरुणांचा जीव इतका स्वस्त आहे का? आपल्या कुटुंबाचा विचार केला आहे. राज्य सरकार मराठा समाजाला आरक्षण देण्यासाठी कटीबद्ध आहे, असं एकनाथ शिंदे यांनी म्हटलं.

मराठा समाजाला सारथी आणि अण्णासाहेब पाटील आर्थिक महामंडळाकडून लाभ दिले जातात त्याची माहिती देण्यासाठी मराठवाड्यात शिबीरं घेत आहोत. मराठा समाजाच्या बांधवांना मी आवाहन करतो, की मी कुणालाही खोटं आश्वासन दिलेलं नाही, मी कुणाची फसवणूक केलेली नाही. मी राजकीय आयुष्यात जे बोललो ते केलेलं आहे. मराठा समाजाला कायद्याच्या चौकटीत टिकणारं आरक्षण द्यायची जबाबदारी घेतलेली आहे. आमचं सरकार पूर्णपणे मराठा समाजाच्या बाजूचं आहे, असं एकनाथ शिंदे यांनी सांगितलं.



मराठा समाजाला आरक्षण देण्यासाठी जे करायचं आहे ते करणार आहे. कुणीही टोकाचं पाऊल उचलू नका, आई वडिलांचा, मुला बाळांचा विचार करा, तुमची तुमच्या कुटुंबाला गरज आहे. आरक्षण मिळवून देण्यासाठी सरकार बांधील आहे. अधिसंख्य पदं देण्यासाठी मी पुढं आलो होतो. अडीच ते चार हजार विद्यार्थी काम करत आहेत. जे जे लाभ द्यायचे आहेत ते युद्ध पातळीवर कसे मिळतील यासाठी सरकारनं निर्णय घेतलेला आहे. टोकाचं पाऊल उचलू नका, ते समाजाला आणि परिवाराला न परवडणारं आहे, असं एकनाथ शिंदे म्हणाले.